**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**महोदय/महोदया,**

शासकीय परिपत्रकानुसार २७ फेब्रुवारी हा श्री.वि.वा.शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा जन्म दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करणेबाबत या विभागाच्या सं.क्र.संलग्नता/ टी-२/३०, दि.०९/०२/२०१८ च्या परिपत्रकानुसार आपणास कळविण्यात आले आहेच. त्यास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सदर दिवशी सकाळच्या सत्रात ११.०० वाजता व दुपारच्या सत्रात ०४.०० वाजता सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांनी कवी सुरेश भट यांनी लिहिलेल्या व संगीतकार कौशल इनामदार यांनी संगीतबध्द केलेल्या "लाभले आम्हास भाग्य" या मराठी अभिमान गीताचे समुह गायन करावे. सदरचे गीत **www.youtube.com/watch?v=PtDBoUqTdvg** या लिकवर उपलब्ध आहे. तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावरदेखील उपलब्ध करून देण्यात आले आहे. सबब, मराठी भाषा गौरव दिनाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत विद्यापीठ कार्यालयास कळविण्यात यावे.

कळावे,

आदेशान्वये
उपकुलसचिव

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 36.
दि. 21 FEB 2018